**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती आशा उत्तम कुंजीर
द्वारा खिस्ते क्वार्टर, कमला नेहरु हॉस्पिटल,
मंगळवार पेठ, पुणे-११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, उत्तरवादी
शिक्षण मंडळ, कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०४/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.८.२००८ |

**३. उपस्थित -**

**अपीलकर्ता** - श्रीमती आशा उत्तम कुंजीर
द्वारा खिस्ते क्वार्टर, कमला नेहरु हॉस्पिटल, मंगळवार पेठ, पुणे-११

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ, कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८ श्री. हरि भिवबुवा भारती

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सन २००१ ते २००७ पर्यंतची ऑडिट रिपोर्टचा वार्षिक जमाखर्च अहवाल, जिल्हा परिषद अंतर्गत पिंपरी चिंचवड मंडळाच्या आलेले सन १ जून २००१ ते ३० सप्टेंबर २००७ पासूनच्या सर्व शिक्षकांची नावासह शासन निर्णयानुसारची बदलीची ऑर्डरची छायांकित प्रत (तालुका गावासह), पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेतील सन १ जून २००१ ते ३० सप्टेंबर २००७ पर्यंतच्या सर्व शिपाई / बालवाडी / अंगणवाडी शिक्षिकेची संख्या, त्यांना देण्यात येणारे वेतन किती, व त्याचे वाटप कशा प्रकारे होते याची सविस्तर माहिती व या मान्यतेचा शासन निर्णय, सन २००७ मध्ये झालेल्या ( जानेवारी ते जून ) माध्यमनिहाय संवर्गनिहाय शिक्षणसेवक भरती दरम्यानची जाहिरात, प्रतिक्षायादीसह निवडयादी, त्याशिवाय शिक्षण सेवक म्हणून भरती केलेल्या सर्व शिक्षकांची नावे, गुण, संवर्ग, नेमणूक, दिनांक, गुणपत्रक छायांकित प्रती, सन २००१ ते ३० सप्टेंबर २००७ पर्यंत शिक्षणसेवक नोकरभरती संदर्भात माध्यमनिहाय सेवाज्येष्ठतेनुसार नेमणुक झालेल्या शिक्षकांच्या रजिस्टर रेकॉर्डमधील छायांकित प्रत व रजिस्टर पडताळणीसाठी देणे, राज्य शासनाने १९९७ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत काही गावे समाविष्ट केली, अशा गावातील शाळांची संपूर्ण पत्यासह नावे इ. माहिती |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती आशा उत्तम कुंजीर यांनी माहिती मागणीच्या मूळ अर्जानुसार पाच मुद्दयांची माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्रीमती कुंजीर यांनी दि. ३.१०.२००७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि.२५.१०.२००७ च्या पत्रान्वये देण्यात आली. ऊवरित माहिती टपालाने पाठविण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी यांनी केले. प्रथम अपील योग्य त्या अधिकाऱ्यांकडे केले नसल्याचे त्यांनी नमूद केले. आपल्याला माहिती मिळाली असून राहिलेला तपशील मिळावा, एवढीच आपली मागणी असल्याचे श्रीमती कुंजीर यांनी सांगितले. मात्र काही मुद्दयांचा तपशील मिळाला नसल्याचे त्यांनी नमूद केले.

टपालाने पाठविलेली माहिती मिळाली नसल्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास समक्ष माहिती द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. आपल्याला अपुरी माहिती मिळाल्याची तक्रार श्रीमती कुंजीर यांनी नंतर आयोगाकडे केली. त्याबाबत आयोगाने जन

माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकरी यांच्याकडून खुलासा मागविला. ऊर्वरित माहिती दि. २१.८.०८ रोजी पाठविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी श्री. हरि भिवबुआ भारती यांनी दि. १४.९.२००९ च्या पत्रान्वये पूरक कागदपत्रांसह आयोगाला कळविले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. २५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बबन आप्पाजी बांगर
कुकडी कॉलनी, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, जुन्नर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बबन आप्पाजी बांगर
कुकडी कॉलनी, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, जुन्नर, जि.पुणे श्री.एच.आर.गरीबे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.आर.जी.खराडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००४ ते २००७ -मौजे बेल्हे येथील गट नं.२२५/२ व २२८/१अ/१ब मधील घराची नोंद कोणाच्या नावे आहे? नोंदी कोणत्या नियमाच्या आधारे करण्यात आलेल्या आहेत? नवीन घराची बांधकामे किती झाली आहेत व त्यांच्या नोंदीचा तपशील. दि.२३.११.२००४, दि.१९.६.२००६ व दि.२०.२.२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जांवर कोणती कारवाई करण्यात आली? | |

## विवेचन

दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

मौजे बेल्हे, ता.जुन्नर येथील घराची नोंद, नवीन घरांची बांधकामे आदीबाबतची माहिती आपण मागितली होती, परंतु ती विलंबाने व चुकीची दिली. आम्ही सात भाऊ एकत्र कुटुंबात असताना घरे बांधलेली आहेत. परंतु आपले गावाकडील चार भाऊ लबाडी करुन घरे स्वत:च्या नावावर करीत आहेत, म्हणून आपल्याला ही माहिती हवी आहे, असे प्रतिपादन श्री.बांगर यांनी केले. एका भावाने सुरु केलेले नवीन बांधकाम त्वरित बंद करावे व त्याच्या कोणत्याही नोंदी ग्रामपंचायतीने करु नयेत, अशीही मागणी त्यांनी सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे विविध पत्रांद्वारे केली आहे.

सन २००४ ते २००७ या काळातील नोंदीची माहिती श्री.बांगर यांनी मागितली होती. ती त्यांना अभिलेखानुसार योग्य अशी देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी

श्री.आर.जी.खराडे यांनी नमूद केले. कागदपत्रांवरुन ते रास्त असल्याचे दिसते. श्री.बांगर यांचे अन्य विषय प्रशासकीय कार्यवाहीचे असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२४.०९.२००९**

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती आशा उत्तम कुंजीर
द्वारा-ख्रिस्ते क्वार्टर, कमला नेहरु हॉस्पिटल, मंगळवार पेठ, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ अधीक्षक,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१६+१७७८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती आशा उत्तम कुंजीर
द्वारा-ख्रिस्ते क्वार्टर, कमला नेहरु हॉस्पिटल, मंगळवार पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका श्री.सुधाकर तांबे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.९.२००७, दि.२८.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००७, दि.३१.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.९.२००७,दि.८.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.१०.२००७,दि.२८.२.२००८ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>१ जून २००८ ते २१ ऑगस्ट २००८-शिक्षणसेवक भरती संदर्भातील संवर्गनिहाय, माध्यमनिहाय जाहिरातीचा तपशील, जाहिरातीनुसार निवड झालेल्या शिक्षकांची निवडयादी, तसेच नोकरभरती केलेल्या शिक्षकांची नावे, रुजू दिनांक, संदर्भ व गुण, तसेच शिक्षकांचे गुणपत्रक व जात प्रमाणपत्र छायांकित प्रत, जिल्हा परिषदेतील बदली अंतर्गत पुणे मनपा शिक्षणमंडळात आलेल्या सर्व शिक्षकांची रुजू दिनांक, संवर्ग व प्रत्येक शिक्षकांचे शासकीय नियमानुसारच्या बदली कारणांचा पुरावा, बदली आदेश इत्यादींची प्रत, बालवाडी शिक्षिका, शिपाई; क्लार्क यांच्या नोकरभरतीचा खुलासा, संख्या, बालवाडी शिक्षिका, शिपाई यांची मानधनावर नियुकती केलेली असल्यास सविस्तर पुराव्यासह खुलासा, नोकरभरती संदर्भात मिळालेली माहिती निशंकास्पद आहे यासाठी रेकॉर्ड / डॉकेट / रजिस्टर्स पदाधिकाऱ्यांच्या सहीशिक्क्यासह पडताळणी पाहणे द्यावे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांची सविस्तर माहिती. | |

## विवेचन

पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडील शिक्षण सेवक भरतीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्त्या सौ.आशा उत्तम कुंजीर यांनी दोन वेगवेगळ्या अर्जांद्वारे मागितली होती. माहिती देण्यास टाळाटाळ केली, तीनदा चुकीची माहिती दिली व माहिती विलंबाने दिली, या कारणावरुन सौ.कुंजीर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत दिली नाही. शिक्षण सेवक भरतीच्या संदर्भातील सविस्तर तपशील आपल्याला मिळणे आवश्यक होते. या अनुषंगाने आपण केलेल्या उपोषणाच्या वेळी माहिती उपलब्ध नसल्यामुळे अडथळा निर्माण झाला. तत्कालीन शिक्षणमंडळ प्रमुख श्री.अशोक राजगुरु यांची बदली झाली व नंतर आलेले श्री.सुधाकर

तांबे यांनीही त्यानंतर माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी शास्ती व्हावी, अशी मागणी सौ.कुंजीर यांनी सुनावणीत केली.

सौ.कुंजीर यांना त्या त्या वेळी माहिती देण्यात आली आहे. तसेच शिक्षण मंडळातील भरतीच्या संदर्भात महानगरपालिकेतर्फे चौकशी सुरु असल्यामुळे काही माहिती त्यावेळी देता आली नाही, असे श्री.तांबे यांनी नमूद केले. सौ.कुंजीर यांच्या दि.२८.१२.२००७ च्या अर्जावर छायांकित प्रतीचे शुल्क भरण्यासाठी दि.११.१.२००८ रोजी कळविले होते, असे श्री.तांबे यांनी सांगितले. हे पत्र आपल्याला मिळाले नसल्याचे प्रतिपादन सौ.कुंजीर यांनी केले.

तत्कालीन शिक्षण मंडळ प्रमुख श्री.अशोक राजगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यास श्री.तांबे यांना त्यांनी कळवावे, तसेच सौ.कुंजीर यांच्या दि.२८.१२.२००७ च्या अर्जावर उत्तर पाठविल्याची जावक बारनिशीतील नोंदीची छायांकित प्रत आयोगाला सादर करावी, तसेच महानगरपालिकेने केलेल्या चौकशीचा अहवाल प्राप्त करुन घेऊन राहिलेली माहिती वृत्तपत्रातील जाहिरातीच्या तपशिलासह सौ.कुंजीर यांना त्वरित द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.१४.८.२००८ रोजी पूर्तता केल्याचा अहवाल श्री.तांबे यांनी आयोगाला सादर केला. सौ.कुंजीर यांना पाठविलेल्या पत्राच्या जावक बारनिशीतील नोंदीची छायांकित प्रतही सादर केली. तसेच श्री.अशोक राजगुरु यांनाही खुलासा करण्याबाबतचा आयोगाचा आदेश त्यांनी कळविला. आयोगाने पुन्हा केलेल्या विचारणेनुसार श्री.राजगुरु यांनी दि.२०.६.२००९ रोजी सविस्तर खुलासा सादर केला. 'माझे कार्यकालावधीमध्ये महानगरपालिका, पुणे स्तरावर शिक्षण मंडळातील कर्मचारी / अधिकारी भरतीच्या संदर्भात गोपनीय स्वरुपात चौकशी सुरु होती. त्यामुळे माहिती देण्यासाठी आवश्यक नस्ती तत्कालीन अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांनी त्यांचे कस्टडीमध्ये जमा केल्या होत्या. महानगरपालिका स्तरावरील चौकशीचा कालावधी प्रलंबित होत गेला. त्यामुळे पूर्ण माहिती देता आली नाही,' असे संबंधित पूरक पत्रांच्या प्रतींसह त्यांनी नमूद केले आहे.

दरम्यान श्री.तांबे यांनी दि.२०.५.२००९ रोजी पुढीलप्रमाणे तपशील सादर केला :-

| अपीलकर्त्याचा मूळ अर्ज | कार्यालयाकडे पत्र आल्याची तारीख | उत्तर पाठविल्याची तारीख |
|---|---|---|
| दि.२२.८.२००७ | दि.२३.८.२००७ | दि.३०.८.२००७ |
| दि.२२.८.२००७ | दि.२३.८.२००७ | दि.३०.८.२००७ |
| दि.१२.९.२००७ | दि.१२.९.२००७ | दि.२८.९.२००७ |
| दि.२८.१२.२००७ | दि.४.१.२००७ | दि.११.१.२००८ |
| दि.८.२.२००८ | दि.१३.२.२००८ | दि.२२.२.२००८ |

वरील बाबी लक्षात घेता अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तरे देण्यात आली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत खुलासा, भाष्य यांची मागणी 'माहिती' म्हणून करता येत नाही. तसेही मुद्दे अपीलकर्त्यांच्या अर्जात आहेत. शिक्षणमंडळाकडील भरतीच्या संदर्भातील चौकशी चालू असल्यामुळे त्या संबंधित मुद्दयांची माहिती त्यावेळी देता आली नाही व तसे अपीलकर्त्यास कळविण्यात आले होते, असे कागदपत्रांवरुन दिसते. मात्र चौकशी पूर्ण होताच अहवाल शिक्षणमंडळाला देण्याची कार्यवाही महानगरपालिका आयुक्त कार्यालयाने करणे आवश्यक होते व तो प्राप्त करुन घेण्याबाबत शिक्षणमंडळ प्रमुख श्री.सुधाकर तांबे तत्परता दर्शविणे आवश्यक होते. त्याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(स्टॅम्प: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.तानाजी नारायण जगताप
मु.पो.डाळज नं.३, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे — उत्तरवादी

**जन माहित्ती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.तानाजी नारायण जगताप
मु.पो.डाळज नं.३, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे श्री.अविनाश सुर्वे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे श्री.विजय घोगरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.पी.एम.धालपे, शाखाधिकारी पळसदेव यांनी दि.१६.७.२००३ पासून केलेल्या कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यांना मंजूर असलेली दैनंदिनी(रोजनिशी) च्या छायांकित प्रती. वि.क्र.४९ च्या दुरुस्तीवेळी वृक्षतोड केली, त्याच्या लिलावाची रक्कम, तसेच वन विभागाची घेतलेल्या परवानगीची प्रत. | |

## विवेचन

दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

शाखाधिकाऱ्यांच्या कामाची दैनंदिनी व वृक्षतोड या संदर्भातील माहिती शेतकऱ्यांच्या दृष्टीने व जवळजवळ १००० ते १२०० हेक्टर क्षेत्राच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वाची असूनही दिली जात नाही. तत्कालीन शाखाधिकारी श्री.पी.एम.धालपे यांच्या दैनंदिनीची अपुरी माहिती देण्यात आली. त्यांनी दैनंदिनी सादर न केल्यामुळे देणे शक्य होत नसल्याचे सांगण्यात आले. ही वस्तुस्थिती असल्यास त्यांच्यावर काय कारवाई केली, त्यांचे वेतन थांबविले का, याची माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.तानाजी नारायण जगताप यांनी केले.

आपल्या विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती श्री.जगताप यांना विहित मुदतीत देण्यात आली. श्री.धालपे यांनी त्यावेळी सादर न केलेल्या दैनंदिनी उपलब्ध झाल्यावर श्री.जगताप यांना पाठविण्यात आली. परंतु श्री.जगताप यांनी ती न स्वीकारल्यामुळे टपाल खात्याने तसा शेरा मारुन ती परत पाठविली आहे. माहिती नेण्याबाबत त्याच वेळी श्री.जगताप यांना पत्र पाठविण्यात आले

असून त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही, असे जन माहिती अधिकारी श्री.विजय घोगरे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

उपस्थिती अहवालाची प्रत अपीलकर्ता यांना द्यावी व श्री.धालपे यांच्या दैनंदिनीच्या प्रती-संदर्भातील खुलासा १५ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले होते. त्यानुसार, 'श्री.जगताप यांनी पूर्वी न स्वीकारलेल्या दैनंदिनीच्या प्रती दि.२४.११.२००८ रोजी स्वत: उपस्थित राहून स्वीकारल्या. माहितीची २१६ पाने मिळाल्याचे त्यांनी लेखी दिले,' असा अहवाल सहाय्यक माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे-११ यांनी दि.२५.११.२००८ रोजी श्री.जगताप यांची पोहोच असलेल्या प्रतीसह सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.९.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.शांतीलाल सोमा तांबे
(२)श्री.अर्जुन लहानबा झैद
मु.पो.सणसवाडी, ता.शिरुर, जि.पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे

उत्तरवादी

(१)**जन माहित्ती अधिकारी** तथा जनसेवा सहकारी बँक लि.,
शिक्रापूर, ता.शिरुर, जि.पुणे
(२)**जन माहिती अधिकारी** तथा जिजामाता सहकारी बँक लि.,
१६३९ बी, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४५+१५४६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अर्जुन लहानबा सैद
मु.पो.सणसवाडी, ता.शिरुर, जि.पुणे

(१)**जन माहित्ती अधिकारी** तथा जनसेवा सहकारी बँक लि.,
शिक्रापूर, ता.शिरुर, जि.पुणे श्री.रमेश बाबुराव ढमढेरे
(२)**जन माहिती अधिकारी** तथा जिजामाता सहकारी बँक लि.,
१६३९ बी, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे-३० श्री.सुनिल भिमाजी खेडकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१०.२००७, दि. ८.१०.२००७ (अ.क्र.१५४६)<br>दि.३.१०.२००७, दि.७.१२.२००७ (अ.क्र.१५४५) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१२.२००७, (अ.क्र.१५४६)<br>दि.११.११.२००७, दि.५.११.२००७ (अ.क्र.१५४५) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.११.२००७, दि.१२.११.२००७ (अ.क्र.१५४६<br>अ.क्र.१५४५) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>**अपील क्र.१५४५**<br>जनसेवा सहकारी बँक लि. शिक्रापूर, ता.शिरुर, जि.पुणे या बँकेच्या सर्व शाखांचे लेखापरीक्षण अहवाल, दोष व दुरुस्तीसह.<br>**अपील क्र.१५४६**<br>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ अन्वये बँकेच्या सर्व शाखांनी कोणती माहिती ग्राहकांना पाहण्यासाठी खुली ठेवली आहे, बँकेतील सर्व शाखांच्या गंगाजळीत दाखल कर्जदारांची यादी रकमेसह सर्व शाखांचा तपशील, या कालावधीतील संचालकांची यादी, संचालकांच्या नातेवाईकांची किती कर्जप्रकरणे गंगाजळीत दाखल आहेत, नाव, रक्कम यासह. आजपर्यंतची थकीत प्रकरणे, त्यातील विनातारण कर्जप्रकरणे, शिफारस कोणाची आहे, वसुलीस विलंबाची कारणे, बँकेने या कालावधीत जाहिरातीसाठी किती रक्कम किती वेळा खर्च केली, सहकार कायद्यानुसार जाहिरात खर्च मर्यादा रक्कम किती आहे, बँकेचे मतदार/सभासद संख्या, नाव पत्त्यासह, निवडणुकीला उभे राहण्याचे सहकार कायद्याचे निकष कोणते, शासन निर्णयाच्या प्रती. शिक्रापूर शाखेतील श्री.शांतीलाल सोमा तांबे यांचे सीसी खाते बंद करण्याची कारणे व तपशील. सर्व शाखातील तक्रार अर्जांची संख्या, केलेली कार्यवाही विलंबाची कारणे. | |

## विवेचन

दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

जनसेवा सहकारी बँक लि., शिक्रापूर, ता.शिरुर जि.पुणे व जिजामाता महिला सहकारी बँक, पुणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बँकेला लागू होत नसल्याचे कारण दिले. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी अपील निकाली काढले.

जनसेवेसाठी आपण माहिती मागितली होती, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.अर्जुन लहानबा सैद यांनी केले. जनसेवा सहकारी बँक लि., शिक्रापूर, ता.शिरुर जि.पुणे व जिजामाता महिला सहकारी बँक, पुणे या नागरी सहकारी बँक असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, तसेच श्री.तांबे यांनी सर्वसाधारण स्वरुपाची व अन्य खातेदारांची माहिती मागितली आहे. ती देता येणार नाही, असे निवेदन बँकेचे प्रतिनिधी श्री.नारखेडकर यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.९.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.तानाजी माधवराव सोनवणे
मु.पो.राहू, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक),
जुनी पी.एम.टी.बिल्डिंग, स्वारगेट, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपवनसंरक्षक,
वनविभाग, सेनापती बापट रोड, पुणे-४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.तानाजी माधवराव सोनवणे
मु.पो.राहू, ता.दौंड, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपवनसंरक्षक,
वनविभाग, सेनापती बापट रोड, पुणे-४ श्री.बी.एन.कदम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.१.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन १९६५ / १९६९ या काळात खात्यात जेवढी नोकरी केली त्याचे प्रमाणपत्र व कोणत्या कारणाने कमी केले त्याचा खुलासा. |

## विवेचन

दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत झाले नाही, त्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

सन १९६५ ते १९६९ या काळात वनविभागात वनरक्षक म्हणून आपण केलेल्या सेवेचे प्रमाणपत्र व कामावरुन का कमी केले याचा खुलासा करावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.तानाजी माधवराव सोनवणे यांनी केली होती. अभिलेखांच्या वर्गीकरणविषयक महाराष्ट्र शासन वनविभागाच्या अ,ब,क,ड सूचीनुसार नेमणुका, बदल्या, पदावनती आदींबाबतचे दस्तऐवज पाच वर्षांपर्यंतची जतन करण्याची तरतूद आहे. श्री.सोनवणे यांनी मागितलेली माहिती चाळीस वर्षांपूर्वीची असून तसे त्यांना त्या त्या वेळी कळविण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक, सेनापती बापट रोड, पुणे श्री.बी.एन.कदम यांनी नमूद केले. संबंधित नियमावली आपण पाहिली असून हे उत्तर आपल्याला मान्य असल्याचे अपीलकर्त्याने सांगितले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.वसंतराव दादू कोळी
रा.खानभाग, घ.नं. ३०८, शेवाळे गल्ली, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक व्यवस्थापक,
पुणे राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग नियंत्रक ,
राज्य परिवहन मंडळ, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२ + ३०७ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १५.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. वसंतराव दादू कोळी
रा.खानभाग, घ.नं. ३०८, शेवाळे गल्ली, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक व्यवस्थापक,
पुणे राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग नियंत्रक ,
राज्य परिवहन मंडळ, सांगली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २८-०३-२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १९-०४-२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | - |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २१-०८-०९ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

वाहनकर दंडाच्या वसुलीसंदर्भात विभाग नियंत्रकानी घेतलेल्या आदेशांच्या छायाप्रती, वसूल केलेल्या दंडाच्या रकमेचा तपशील, अर्जदाराच्या प्रवासभत्ता रक्कम रु.१८००/- वसुलीच्या आदेशाची प्रत, तसेच अर्जदाराकडून पगार वसूल केलेल्या आदेशाच्या प्रती इ.

## विवेचन

रोखलेली वेतनवाढ, पगारातील वसुली याबाबतची माहिती न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री. वसंतराव दादू कोळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. कोळी यांच्या जात पडताळणीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीशी संबंधित असा हा विषय आहे. सन १९९३ पासूनचा हा प्रश्न असून श्री. कोळी विविध पातळ्यांवर याबाबत अर्ज, पत्रव्यवहार करीत आले आहेत. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन मंडळ, सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, पुणे राज्य परिवहन मंडळ, पुणे विभाग, यांनी लेखी निवेदनाद्वारे दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. श्री. कोळी यांची तक्रार कायम राहिल्याने सुनावणी घेण्यात आली. श्री. कोळी यांना यापूर्वी माहिती पाठवण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी श्री. रा. अ. तोरो व अपिलीय प्राधिकारी श्री. रा. चं. पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यानुसार सर्व माहिती मिळाली असल्याचे श्री. कोळी यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. संपत पांडुरंग आबदार
'अवधूत', जयभवानी कॉलनी, **अपीलकर्ता**
रिंगरोड, फुलेवाडी, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता, **उत्तरवादी**
सार्वजनिक बांधकाम मंडळ,कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६५ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.८.२००६ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.९.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.९.२००८ |
| ५ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती** - उड्डाण पूल बांधण्यासाठीच्या निविदा निश्चितीच्या माध्यमातून झालेल्या अपहाराबाबात | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संपत पांडुरंग आबदार यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग कोल्हापूर यांच्याकडे उड्डाण पूल बांधणेबाबतच्या निविदा निश्चितीच्या माध्यमातून झालेल्या अपहाराबाबत माहिती मागितली आहे. श्री. आबदार यांनी अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकारी यांचे उत्तर इ. आवश्यक असणारी कोण तीही कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६ -१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

सौ.माधवी विजय आठल्ये
रा.फ्लॅट क्र.७, श्रावणगड अपार्टमेंट,
गल्ली नं.११४, प्रशांत रोड, एरंडवणा, पुणे-४ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.०८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्त्या** --

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.मदन रामचंद्र आढारी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री.अनिरुध्द घनश्याम पावसकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०२.०१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.०१.२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मौजे महर्षि, कर्वेनगर, ता.हवेली येथील स.नं.१/६ + २२/१९ चा झोन दाखला | |

## विवेचन

अपीलकर्त्या सौ.माधवी विजय आठल्ये यांनी मौजे महर्षि, कर्वेनगर, ता.हवेली येथील स.नं.१/६ + २२/१९ चा झोन दाखला जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना, पुणे महानरगपालिका, पुणे यांच्याकडे मागितला होता. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

वरील अपिलामध्ये अपीलकर्त्यांनी स्वाक्षरी केलेली नाही. या अपिलांमध्ये दि.२८.०८.२००८ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी समक्ष हजर होते, मात्र अपीलकर्ता गैरहजर होते.

अपीलकर्त्याने 'झोन दाखला' मागणी केली असून महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार असे दाखले प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतंत्र तरतूद आहे. अशा नकलांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करण्यापेक्षा अपीलकर्त्यांनी प्रचलित नियमावलीनुसार त्यासाठी अर्ज करुन त्याप्रमाणे विहित केलेले शुल्क भरुन घेणे अधिक उचित ठरले असते. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : ३०/०१/२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.आशा उत्तम कुंजीर
द्वारा-ख्रिस्ते क्वार्टर, कमला नेहरु हॉस्पिटल, मंगळवार पेठ, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
प्राथमिक शिक्षण मंडळ कार्यालय, सोलापूर महानगरपालिका, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६८५ / पुणे /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.आशा उत्तम कुंजीर
द्वारा-ख्रिस्ते क्वार्टर, कमला नेहरु हॉस्पिटल, मंगळवार पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे श्री.वि.नि.जगताप

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.२.२००८ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | १ जून २००८ ते २१ ऑगस्ट २००८-शिक्षणसेवक भरती संदर्भातील संवर्गनिहाय, माध्यमनिहाय जाहिरातीचा तपशील, जाहिरातीनुसार निवड झालेल्या शिक्षकांची निवडयादी तसेच नोकरभरती केलेल्या शिक्षकांची नावे, रुजू दिनांक, संदर्भ व गुण, तसेच शिक्षकांचे गुणपत्रक व जात प्रमाणपत्र छायांकित प्रत, जिल्हा परिषदेतील बदली अंतर्गत सोलापूर मनपा शिक्षणमंडळात आलेल्या सर्व शिक्षकांची रुजू दिनांक, संवर्ग व प्रत्येक शिक्षकांचे शासकीय नियमानुसारच्या बदली कारणांचा पुरावा, बदली आदेश इत्यादींची प्रत, सोलापूर मनपा शाळेतील बालवाडी शिक्षिका, शिपाई, क्लार्क यांच्या नोकरभरतीचा खुलासा, संख्या, बालवाडी शिक्षिका, शिपाई यांची मानधनावर नियुक्ती केलेली असल्यास सविस्तर पुराव्यासह खुलासा, वार्षिक जमाखर्च अहवाल, ऑडिट रिपोर्ट, सेवाज्येष्ठतेनुसार नेमणूक झालेल्या शिक्षकांच्या रजिस्टर रेकॉर्डमधील छायांकित प्रत, प्रत्येक पान स्वाक्षरीसह. |

## विवेचन

सोलापूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण मंडळाकडील शिक्षण सेवक भरतीच्या अनुषंगाने अपीलकर्त्या सौ.आशा कुंजीर यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे माहिती मागितली होती. सौ.कुंजीर यांनी माहिती न मिळाल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांच्याकडे अपील केले. दि.२५.१०.२००७ रोजी कळविल्याप्रमाणे शुल्क भरुन अर्जात नमूद केल्याप्रमाणे व्यक्तिशः माहिती घेऊन जावी, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी यांनी त्यांना त्यानंतर कळविले. चुकीची माहिती देणे, अपूर्ण माहिती देणे, तसेच ऊर्वरित माहिती देण्यास टाळाटाळ करणे, अशी कारणे नमूद करुन सौ.कुंजीर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्याला माहिती मिळाली नसल्याचे व या संदर्भात दूरध्वनीवर चर्चा झाल्याचे सौ.कुंजीर यांनी प्रतिपादन केले. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी यांनी सौ.कुंजीर यांना दि.२५.१०.२००७ रोजी दिलेल्या उत्तरातही तीन मुद्दयांची माहिती संकलित करुन तयार करण्यास वेळ लागणार असल्याबाबत भ्रमणध्वनीवरुन प्रत्यक्ष चर्चा झाल्याचे नमूद केले आहे. दोन मुद्दयांची माहिती तयार असल्याचे व शुल्क भरण्याबाबत त्यांनी या पत्रात कळविले आहे. सहाव्या मुद्दयाची

माहिती तयार असल्याचे व शुल्क भरण्याबाबत त्यांनी या पत्रात कळविले आहे. सहाव्या मुद्दयाची माहिती दिली आहे. आपण नव्याने पदभार घेतला असून या विषयातील कार्यवाहीचा आढावा घेतलेला नसल्याचे विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.वि.नि.जगताप यांनी नमूद केले. हा आढावा घेऊन तीन दिवसात त्यांनी अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.जगताप यांनी दि.२७.८.२००८ रोजी आयोगाला अहवाल सादर केला. मुद्दा क्र.१ ते ३ ची माहिती संकलित करुन तयार करण्यास वेळ लागणार असल्याचे सौ.कुंजीर यांना कळविण्यात आले होते. व्यक्तिश: माहिती घेण्याचे त्यांनी अर्जात नमूद केले होते, त्यानुसार माहिती घेऊन जाण्यास कळविले होते, परंतु त्या आल्या नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे त्यांनी अपील करणे आवश्यक होते, ते त्यांनी केले नाही. मुद्दा क्र.१ ते ३ च्या संदर्भात कार्यालयाकडून पुढील कोणतीही आवश्यक ती कार्यवाही झालेली दिसत नाही. दि.२५.१०.२००७ नंतर जे जे अधिकारी प्रभारी प्रशासन अधिकारी म्हणून कार्यरत होते व जन माहिती अधिकारी म्हणून ज्यांच्याकडे जबाबदारी होती, त्यांनी याबाबत कोणतीही उचित कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सौ.कुंजीर यांना माहिती मिळण्यास विलंब झालेला आहे, असे श्री.जगताप यांनी या अहवालात नमूद केले आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार दि.१.१०.२००७ ते दि.२३.६.२००८ या कालावधीत श्री.विलास सु. लोकरे हे जन माहिती अधिकारी होते व श्री.एम.एस.मुजावर, श्री.एस.बी.उंबरे, श्री.एस.के.सगरे, श्री.एस.आर.कडलक (सर्व प्रभारी), श्री.वि.वि.जगताप हे या कालावधीतील अपिलीय प्राधिकारी होते. हे लक्षात घेता श्री.विलास सु.लोकरे यांनी विहित मुदतीत उत्तर दिले, मात्र नंतर कोणती कार्यवाही केली, हे स्पष्ट नाही. अपीलकर्त्यांनीही नेमकेपणाने पुढील कृती केलेली नाही. सौ.कुंजीर यांनी दि.१२.११.२००७ रोजी अपिलाचे म्हणून सादर केलेल्या जोडपत्र ब मध्ये अपिलीय प्राधिकारी यांचे नाव, पदनाम आदीचा उल्लेख नाही, तसेच त्यानंतर दि.७.२.२००८ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना उत्तर पाठविले असून त्यावर सौ.कुंजीर यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केलेले नाही. सबब अपिलीय प्राधिकाऱ्यांना जबाबदार धरता येणार नाही. श्री.लोकरे यांनी अधिक काटेकोरपणे अर्जाबाबत कार्यवाही करणे आवश्यक होते.

आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सौ.कुंजीर यांना माहिती देण्याबाबत विहित मुदतीत कार्यवाही करण्यात येत असल्याचे श्री.जगताप यांनी अहवालात नमूद केले आहे. त्यानुसार माहिती तयार असून ती समक्ष कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जावी, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांनी सौ.कुंजीर यांना कळविल्याच्या दि.२.९.२००८ च्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. अपीलकर्त्यांनी त्याबाबत आयोगास काहीही अवगत केलेले नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) माहिती मागणीच्या अर्जाबाबत काटेकोरपणे कार्यवाही करण्याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. सुभाष लोकरे यांना देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ. विजया विनायक ढोले
४५, गिरीजा सोसायटी, एम.आय.टी.जवळ,
कोथरूड, पुणे-३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उत्तरवादी
करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** सहाय्यक कर आकारणी
व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १३.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - सौ. विजया विनायक ढोले
४५, गिरीजा सोसायटी, एम.आय.टी.जवळ, कोथरूड, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (वि) करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. विलास कानडे

**जन माहिती अधिकारी** सहाय्यक कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. दयानंद एस. सोनकांबळे

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

स्वतःचे मालकीची मौजे कोथरूड येथील जमीन स.नं.१२४/९/२ ही मोकळी बखळ असून पुणे महानगरपालिकेच्या शेड्यूल चॅप्टर नियम ७ किंवा तत्सम अन्य नियम जे मोकळ्या जमिनीचे करासंबंधी सन १९८९-९० ते आज तागायत लागू होते/आहेत त्याची प्रत, तसेच माझ्या मालकीच्या ताब्यातील मिळकतीला १५ टक्के सूट व ६० टक्के इतके वाजवी भाडे लागू न करण्याबाबत काही नियम आहेत का, असल्यास त्याची प्रत

**विवेचन**

मालकाच्या ताब्यातील मिळकतीला १५ टक्के सूट व ६० टक्के इतकेच वाजवी भाडे समजावे अशी तरतूद असताना आपल्या मालकीच्या मोकळ्या बखळ जमिनीवरील कर आकारणी करताना कोणतीही सूट दिलेली नाही, या तक्रारीच्या अनुषंगाने अपीलकर्त्या सौ. विजया विनायक ढोले यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. माहिती न मिळाल्याच्या कारणावरून सौ. ढोले यांनी अपिलीय प्राधिकारी तथा करआकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु 'त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांच्या कर्तव्य पालनाच्या कसूरीवर पांघरून घालण्याचा प्रयत्न केला' व आपल्याला योग्य माहिती मिळाली नाही, अशा कारणावरून सौ. ढोले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सन २००१ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार ती मोकळी जागा असल्याचे स्पष्ट आहे. मात्र असे असतानाही त्यावरील आकारणी अयोग्य पध्दतीने केली आहे, त्याबाबत आपण पाठविलेल्या पत्राची दखल घेतली गेली नाही. या संदर्भात जिल्हा न्यायालय, पुणे येथे दावा दाखल केलेला असल्यामुळे माहिती देता येत नाही, असे आपल्याला तोंडी सांगितले गेले. मात्र न्यायालयात दावा दाखल असताना माहिती नाकारता येणार नाही, असे प्रतिपादन सौ. ढोले यांनी केले.

सौ.ढोले यांनी हा विषय यापूर्वीही मांडला असून संबंधित नियमांची माहिती त्यांना यापूर्वी देण्यात आली आहे. मोकळ्या जागेला ४० टक्के कर सवलत देता येणार नाही, हा धोरणात्मक निर्णय असून त्याची प्रत त्यांना दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करआकारणी व करसंकलन

प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. दयानंद एस. सोनकांबळे यांनी केले. ऊर्वरित माहिती सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यांना देण्यात आली.

सौ. ढोले यांनी सादर केलेल्या निवेदनात आपल्या मोकळ्या जमिनीवरील कर आकारणी अयोग्य असल्याचे आक्षेप नोंदविले आहेत, तसेच दि. ३.४.१९७० नंतर गेल्या साडेअडतीस वर्षात मूळ निर्णयात बदललेल्या परिस्थितीनुसार बदल करणे आवश्यक असताना तो केलेला नाही, इ. मुद्दे या निवेदनात त्यांनी मांडले आहेत. ते, तसेच कोणताही वापर नसलेली / उत्पन्न न होणारी मोकळी जमीन ४० टक्के सूट देय नसेल तर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र दाखल करावे, अशा स्वरूपाची मागणी या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १०.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

सौ. माधवी विजय आठल्ये
फ्लॅट नं.७, श्रावणगड अपार्टमेंट,
गल्ली नं.१४, प्रशांत रोड, एरंडवणा,
पुणे-४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण, विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण, विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.०८.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण, विकास योजना विभाग,<br>पुणे महानगरपालिका, पुणे-५<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,<br>पुणे महानगरपालिका, पुणे-५ | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०२.०१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.०१.२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे महर्षि कर्वेनगर, ता.हवेली येथील सिटी सर्व्हे नं.१/६ + २२/१९ च्या झोन दाखल्याची सत्यप्रत | |

## विवेचन

अपीलकर्त्याने मूळ झोन दाखल्याच्या सत्यप्रतींची मागणी केली आहे. शासनाच्या प्रचलित नियमानुसार असे दाखले प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतंत्र तरतूद आहे. अशा दाखल्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करण्यापेक्षा अपीलकर्त्याने प्रचलित नियमावलीनुसार त्यासाठी स्वतंत्रपणे अर्ज करुन व त्यासाठी विहित केलेले शुल्क भरुन झोन दाखला प्राप्त करुन घेणे अधिक उचित ठरले असते. या अपीलाची सुनावणी दि.२८.०८.२००८ रोजी घेण्यात आली. या सुनावणीस अपीलकर्ता अनुपस्थित होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २४/०९/२००९**

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. रविंद्रकुमार तोडकर
५८७, बुधवार पेठ,
पाटील सदन, पुणे ४११ ००२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपअभियंता,
विकास योजना विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे -५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा विकास उपअभियंता,
(बांधकाम नियंत्रण), विकास योजना विभाग,
पुणे महानरगपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२९ + १७३० + १७४०/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.०८.२००८ |
| **३.** | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** -- | |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा उपअभियंता,<br>विकास योजना विभाग,<br>पुणे महानगरपालिका, पुणे -५ | श्री. मदन रामचंद्र आढारी. |
| | **जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,<br>(बांधकाम नियंत्रण), विकास योजना विभाग,<br>पुणे महानरगपालिका, पुणे-५ | श्री. अनिरुद्‌ध धनश्याम पावसकर. |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.०१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०२.०२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.०२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे भांबुर्डा (शिवाजीनगर) पुणे येथील सर्व्हे नं.२८० व २८१ च्या झोन दाखल्याच्या सत्यप्रती मिळणेची मागणी | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रविंद्रकुमार तोडकर यांनी मौजे भांबुर्डा (शिवाजीनगर), पुणे येथील सर्व्हे नं.२८० व २८१ च्या 'झोन दाखल्या' च्या सत्य प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता (बांधकाम नियंत्रण) विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडे केली होती.

प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे तीन अपिले दाखल केली आहे. वरील सर्व अपिलांमध्ये अपीलकर्त्याच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षरीत तफावत असून तीन प्रथम अपिलांवर अपीलकर्त्याने स्वाक्षरी केलेली आढळत नाही. या सर्व अपिलांमध्ये दि.२८.०८.२००८ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी समक्ष हजर होते, मात्र अपीलकर्ता गैरहजर होते. तसेच अपीलकर्त्याने झोन दाखल्याची मागणी केली असून महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार असे दाखले प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतंत्र तरतूद आहे. अशा नकलांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करण्यापेक्षा अपीलकर्त्यानी प्रचलित नियमावलीनुसार त्यासाठी अर्ज करुन व त्यासाठी विहित केलेले शुल्क भरुन झोन दाखला प्राप्त करुन घेणे अधिक उचित ठरले असते. सबब आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील तीन अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दिनांक : २९/०९/२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रफिक बाबुलाल मणियार
२५९, भवानी पेठ, सापिका पथ, पुणे-४२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, — उत्तरवादी
(पाणी पुरवठा), पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
(पाणी पुरवठा), पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. रफिक बाबुलाल मणियार
२५९, भवानी पेठ, सापिका पथ, पुणे-४२

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
(पाणी पुरवठा), पुणे महानगरपालिका, पुणे यांचे प्रतिनिधी
श्री. एस. के. पवार

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
(पाणी पुरवठा), पुणे महानगरपालिका, पुणे यांचे प्रतिनिधी
श्री. पी. एस. निरभवणे (वि.अ.)

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत जोडलेल्या छायांकित प्रतीनुसार

## विवेचन

पुणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा खात्यात नोकरीबाबत आपल्याला का डावलण्यात आले, यासह तेरा मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. रफिक बाबुलाल मणियार यांनी मागितली होती. जन माहिती

अधिकारी तथा नगर उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलात कोणतीही कार्यवाही केली नाही, म्हणून श्री. मणियार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. औद्योगिक न्यायालयाच्या निकालाविरूध्द उच्च न्यायालयात जाण्याबाबतच्या शिफारशीची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१)(छ) नुसार नाकारली. आपल्याला नोकरीविषयक न्याय मिळण्याच्या दृष्टीने महत्वाची अशी ही माहिती होती, असे श्री. मणियार यांनी अपील अर्जात नमूद केले आहे.

नोकरीविषयी आपल्यावर अन्याय झाला आहे. तो दूर होण्यासाठी आपण प्रयत्न करीत असून माहिती अपुरी व दिशाभूल करणारी दिली गेली व महत्त्वाची माहिती टाळण्यात आली, असे प्रतिपादन श्री. मणियार यांनी केले. श्री. मणियार यांनी मागितलेली माहिती व्यापक स्वरूपाची व अनेक विभागांशी संबंधित होती. ती संकलित केली जात असल्याचे त्यांना विहित मुदतीत कळविले व संकलित होताच ती देण्यात आली. 'न्याय आणणाऱ्यांना विरोध करणे या कार्यपध्दतीची माहिती द्यावी,' अशा स्वरूपाची विचारणा श्री. मणियार यांनी केली होती, असे जन माहिती अधिकारी श्री. पी.एस.निरभवणे यांनी नमूद केले.

श्री. मणियार यांचा मुख्य प्रश्न नोकरीचा आहे. तसेच त्यांनी मागितलेली माहिती अनेक मुद्दयांचा खुलासा विचारणारी आहे. ती वगळता ऊर्वरित सर्व देय माहिती त्यांना दिली गेली पाहिजे. अपिलाची दखल न घेण्याची तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता (पाणी पुरवठा), पुणे महानगरपालिका,पुणे श्री. वि. जी.कुलकर्णी यांची कृती योग्य नाही, त्याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

श्री. मणियार यांना अजूनही हवी असलेली माहिती आठ दिवसांत द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार दि. ५.९.२००८ रोजी श्री. मणियार यांना माहिती देण्यात आल्याचा अहवाल दिलेल्या माहितीच्या व श्री. मणियार यांची पोहच दर्शविणाऱ्या पत्राच्या छायांकित प्रतीसह विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री. एस.के.पवार यांनी दि. ६.९.२००८ रोजी आयोगाला सादर केला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश नानासाहेब वाघेरे
रा. पिंपरीगाव पोस्ट ऑफिस समोर,
पिंपरी वाघेरे, पिंपरी, पुणे-१८

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य वैदकीय अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रमेश नानासाहेब वाघेरे
रा. पिंपरीगाव पोस्ट ऑफिस समोर, पिंपरी वाघेरे, पिंपरी, पुणे-१८

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे श्री. सुभाष डुंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य वैदकीय अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे डॉ. नागकुमार कुणचगी

**मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत प्रत जोडली आहे.

## विवेचन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य वैदकिय अधिकारी डॉ. नागकुमार कुणचगी यांच्या संदर्भातील माहिती त्यांनीच नाकारली. अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी डॉ. कुणचगी यांच्यावर दंडात्मक कारवाई न करता अपील अंशतः मान्य करून अपूर्ण माहिती देण्याचा आदेश दिला, या कारणावरून अपीलकर्ता श्री. रमेश नानासाहेब वाघेरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

डॉ. कुणचगी यांच्याकडे असलेल्या पदाच्या अनुषंगाने व सार्वजनिक कामासंबंधची माहिती आपण मागितली आहे. परंतु 'ही माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने माहिती देण्यास त्यांनी विरोध व्यक्त केला असल्यामुळे माहिती देता येत नाही,' असे जन माहिती अधिकारी तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. कुणचगी यांनीच कळविले, असे प्रतिपादन श्री. वाघेरे यांनी केले. अपूर्ण माहिती देण्याचा आदेश आपण दिला, हे श्री. वाघेरे यांचे म्हणणे चुकीचे आहे. ही माहिती त्रयस्थ पक्षाची असून त्यांच्या हरकतीला जन माहिती अधिकाऱ्यांनी अवास्तव महत्त्व दिल्यामुळे तसे स्पष्टपणे नमूद करून अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती देण्याचा आदेश दिला, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. सुभाष डुंबरे यांनी केले. वैयक्तिक स्वरूपाची माहिती मागितली होती. उच्च न्यायालयात दावा दाखल असून त्यामुळे ही माहिती देण्याने आपले व्यक्तिगत नुकसान होण्याचा संभव असल्यामुळे माहिती घेण्यास हरकत घेऊन आपण माहिती नाकारली, असे प्रतिपादन डॉ. कुणचगी यांनी केले.

श्री. वाघेरे यांनी मागितलेल्या माहितीत वैयक्तिक स्वरूपाची कोणतीही माहिती नाही. डॉ. कुणचगी हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेत असून तेथील कामकाजाविषयक माहिती मागितली आहे. डॉ. कुणचगी यांच्या सेवा काळात दाखल झालेल्या सर्व गैर केसेसची माहिती द्यावी, असा एक मुद्दा अपीलकर्त्याच्या अर्जात आहे. अशा प्रकारच्या सरसकट माहितीची मागणी करणे योग्य नाही. विशिष्ट दाव्याबाबतची माहिती मागितल्यास ती देणे, व सरसकट व विस्तृत स्वरूपातील माहितीबाबत अभिलेखाचे अवलोकन करू देणे अशी कार्यवाही जन माहिती अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेतील पदावरील कामाच्या अनुषंगाने दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणांची माहिती आपल्याला हवी असल्याचे

श्री. वाघेरे यांनी स्पष्ट केले. अशी माहिती वैयक्तिक मानता येणार नाही. त्यामुळे विस्तृत माहिती मागितली असेल तर तेथे अभिलेखाचे अवलोकन करू द्यावे व मागणीनुसार सर्व माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. जन माहिती अधिकारी म्हणून स्वतःला त्रयस्थ पक्ष ठरवून स्वतःचे अभिवेदन मागवून त्याच्या आधारे माहिती नाकारणे ही डॉ. कुणचगी यांची कृती योग्य नाही. याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ .९.२००९**